# नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई

## उत्सवाच्या वेळी रस्त्यावर उभारण्यात येणारे तात्पुरत्या स्वरुपातले मंडप/स्टेज यामुळे रहदारीस अडथळा न होऊ देणे तसेच ध्वनी प्रदूषणाबाबत नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रभावीरित्या सुविधा उपलब्ध करणे यासाठी निश्चित करण्यात आलेली

# मार्गदर्शक तत्त्वे-२०१५

**मा. सर्वोच्च न्यायालयातील न्याय निवाडा**

**1994 6 Supreme Court Case 360**

**मा. उच्च न्यायालय निर्देश जनहित याचिका क्र.१७३/२०१०**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | २ |
| २. | मार्गदर्शक तत्त्वे | ३ |
| ३. | सार्वजनिक उत्सवांच्या दरम्यान उभारण्यात येणा-या मंडपाकरीता ना हकरत दाखला देणेसाठी नियमावली निश्चित करणे. (महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.५०६, दिनांक २१/०३/१९९६) मा. आयुक्त, नमुंमपा यांचे आदेश क्र.नमुंमपा/अतिक्रमण/३१४१/२००२, दि.२८/०६/२००२. | ९ |
| ४. | महानगरपालिका अधिनियम चे कलम २३४ अन्वये उत्सवाच्या प्रसंगी मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे संमतीने रस्त्यावर/सार्वजनिक ठिकाणी मंडप/स्टेज/ कमान वगैरे तात्पुरते उभारण्यास परवानगी देणेबाबतचे कार्यादेश. | ११ |
| ५. | (ध्वनी प्रदूषण नयंत्रण व नियमन) नियम, २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्याबाबत. शासन निर्णय दिनांक १७/०६/२००९ | १५ |
| ६. | ध्वनी प्रदूषण नयंत्रण व नियमन २००० अन्वये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जाहिर करण्यात आलेले शांतता क्षेत्र अधिसूचना २०११ | ३१ |
| ७. | NOISE POLLUTION (REGULATION & CONTROL), RULES 2000 | ४३ |

**श्री. दिनेश वाघमारे**
**आयुक्त**

# प्रस्तावना

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात गणपती व नवरात्रोत्सव, रमझान महिना, बकरी ईद, मोहरम, नाताळ, १४ एप्रिल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन) व सर्व धार्मिक उत्सव साजरे केले जातात. या उत्सवा दरम्यान मोठया प्रमाणात मंडप उभारण्यासाठी विविध संस्था महापालिकेकडे अर्ज करीत असतात. महाराष्ट्र महापालिका अधिनियम चे कलम २३४ अन्वये मा. पोलीस आयुक्त यांच्या संमतीने रस्त्यावर मंडप उभारण्यासाठी मा. महापालिका आयुक्त परवानगी देऊ शकतात.

सार्वजनिक उत्सवाच्यावेळी बहुतेक मंडळे ही महानगरपालिकेच्या वाहतुकीच्या रस्त्यावरच मंडप उभारणी करतात अशावेळी परिसरात असलेल्या नागरीकांना तसेच वाहतुकीस अडथाळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. सार्वजनिक उत्सवामध्ये तातपुरत्या स्वरुपात बांधलेल्या मंडपाचा अडथळा होऊ नये तसेच सार्वजनिक उत्सवही साजरे करता यावेत व परिसरातील नागरीक व रहदारीला कमीत कमी त्रास व्हावा या दृष्टीकोनातून वेळोवेळी नवी मुंबई महानगरपालिकेने मार्गदर्शक तत्वे व कार्यालयीन पदधती तयार केली आहे.

डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचीका क्र.१७३/२०१० अन्वये मा. उच्च न्यायालयाने सार्वजनिक उत्सव साजरे करताना रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही , तसेच ध्वनीक्षेपकामुळे होणारे प्रदुषण नियंत्रीत करणे व नागरिकांसाठी तक्रार स्वीकारण्याची सुवीधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिलेले आहेत व निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत मा. मुख्य सचिवांकडे धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत विचारणा केलेली आहे.

त्याअनुषंगाने सण साजरे करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, ध्वनी प्रदुषण होणार नाही, रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही व मा. उच्च न्यायालयाने घालुन दिलेल्या नियमांचे सार्वजनिक मंडळाकडुन उचित पालण होण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे जन भावनांचा मान राखुन आणि जनजिवन विस्कळीत होऊ न देता जनहितर्थ मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आलेली आहेत. तसेच सदर प्रकरणी नागरीकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी तक्रार निवारण व्यवस्था निर्माण केलेली असून सदर सुविधेस उचित प्रसिदधी देण्यात येत आहे.

सदर मार्गदर्शन तत्वांमुळे सार्वजनिक उत्सव शांततेत व सुरळीत जनजीवन विस्कळीत न होता साजरे करण्यास निश्चितच मदत होईल असा मला विश्वास आहे.

**(दिनेश वाघमारे)**
**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**...२...**

## मार्गदर्शक तत्वे :-

● **अर्ज सादर करण्याची पदधती :-**

१) सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी रस्ता / सार्वजनिक ठिकाणी मंडप/स्टेज इ. उभारण्यास परवानगी मिळणे बाबत संबंधीत मंडळाने विहित नमुन्यात स्थानिक पोलीस स्टेशन, पोलीस शाखा व अग्निशमन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्रासह सार्वजनिक उत्सवाच्या ३० दिवस अगोदर परिमंडळाअंतर्गत येणारे सर्व विभागातील संबंधित विभाग अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

२) संबंधीत मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप/स्टेज इ उभारणेसाठी रस्त्याच्या १/४ भागापेक्षा अधिक असणार नाही व रहदारीस/सार्वजनिक वाहतुकीस कोणताही अडथळा येणार नाही व नागरीकांना त्यापासुन उपद्रव तसेच आक्षेपार्ह होणार नाही याची दक्षता संबंधीत मंडळाने घ्यावयाची आहे. मंडप/स्टेज इ. उभारणे करीता प्रचलित आकाराचा तक्ता खालील प्रमाणे:-

| रस्त्याची रुंदी | मंडप/स्टेजसाठी दिली पाहिजे अशी कमाल रुंदी | पोकळी/खुली असली पाहिजे अशी रस्त्याची रुंदी |
|---|---|---|
| २५ फुट | ६.२५ फुट | १८.७५ फुट |
| ५० फुट | १२.५ फुट | ३७.५ फुट |
| ७० फुट | १७.५ फुट | ५२.५ फुट |

३) मंडळाने शहरातील रस्ते नादुरुस्त तथा खोदले जाऊन खराब होणार नाहीत अशी हमी अर्जामध्ये देणे बंधनकारक राहील.

- **पूर्व इतिहास :-**

४) मागील वर्षी ज्या मंडळांना मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी ज्या जागेवर परवानगी देण्यात आलेली होती त्याच जागेवर अर्जाच्यावेळी परवानगी देण्यात येईल. परंतु प्रशासकिय कामकाजाच्या आवश्यकतेनुसार नवी मुंबई महानगरपालिका सदर बाबींमध्ये योग्य तो बदल करु शकते.

५) रस्त्याच्या १/४ भागाच्या आकाराचा मंडप / स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देण्यात येईल. नवी मुंबई महानगरपालिका आवश्यकतेनुसार मंडप उभारण्याची परवानगी दयावी किंवा नाही या बाबत स्वेच्छाधिकार अबाधित ठेवत आहे. तसेच मंडप/स्टेज आकार कमी करण्याचे निर्देश सुध्दा मंडळांना देऊ शकते.

- **कायदेशीर तरतुद :-**

६) महापालिकेने परवानगी दिल्यानुसारच मंडप/स्टेज इ. उभारणे संबंधीत मंडळांवर बंधनकारक आहे. परवानगी व्यतिरीक्त संबंधीत मंडळाने मंडप/स्टेज इ. उभारल्याचे निदर्शनास आल्यास ते मनपा अतिक्रमण व परिमंडळ विभागाचे उप आयुक्त/सहाय्यक आयुक्त/संबंधीत प्रभागाचे प्रभाग अधिकारी(विभाग अधिकारी) यांनी पोलिस अधिकाऱ्यांच्या मदतीने काढून टाकण्यात येईल व संबंधीतांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच महानगरपालिकेने दिलेल्या सुचनेनुसार मंडप/स्टेज नसल्यास सदरचा मंडप/स्टेज नवी मुंबई महानगरपालिका पूर्वसूचना न देता काढू शकते.

७) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. ईएनव्ही-२०१०/प्र.क्र.१०६/ता.क.३ दि.०३/०५/२०११ अन्वये दिलेल्या निर्देशांप्रमाणे सार्वजनिक उत्सव साजरे करणारी मंडळे यांचे कडून सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

८) महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभाग, वन विभाग, नगर विकास विभाग व इतर विभागांनी वेळोवेळी पारित केलेल्या शासन निर्णय व मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन संबंधीत मंडळाने करणे बंधनकारक आहे.

- **दक्षता :-**

९) ज्या प्रस्तावित मंडप/स्टेज इ. उभारणीची जागा हि परिवहन सेवेच्या बस मार्गांवर असेल त्या रस्त्यांवर मंडप/स्टेज इ. उभारणी करीता किमान १२ फुट रुंद जागा हि बसेस, रिक्षा व सार्वजनिक वाहतुकीला ट्रॅककरीता उपलब्ध राहिल याची दक्षता घेण्यात यावी.

१०) संबंधित मंडळाने मंडप/स्टेज इ. यांची उभारणी करताना ते रोड जंक्शन पासून किमान रस्त्याच्या रुंदीच्या अर्धे या प्रमाणे जंक्शन पासून लांब राहिल जेणेकरुन वाहने वळविणे सोपे होईल अशा पध्दतिने कार्यवाही करावी.

११) सेबंधीत मंडळास मंडप/स्टेज इ. उभारणी करण्यासाठी कोणत्याही ठिकाणचा सिमेंट कॉंक्रीट रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर खोदाई करण्याकरीता परवानगी देण्यात येणार नाही. अशा ठिकाणी मंडप घालावयाचे झाल्यास वाळूने भरलेल्या ड्रम वर मंडप/स्टेज या करीता आवश्यक असणारे बांबू रोवण्यात यावेत. रस्ते/सार्वजनिक खोदाई करुन मंडप/स्टेज इ. उभारणी केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत मंडळांवर रस्ते अनधिकृतपणे खोदाईबाबत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१२) ज्या ठिकाणी पक्या स्वरुपाचे रस्ते दुभाजक आहेत अशा ठिकाणी पदपथ व दुभाजक यामधील रस्त्याच्या भागातील १२ फुटांव्यतिरिक्त उर्वरित जागेवर मंडपाची उभारणी संबंधित मंडळाने करावी.

१३) कोणत्याही ठिकाणी रहदारीला अडथळा येणार नाही अशा रस्त्याच्या जागेत मंडप/स्टेज इ. उभारणीकरीता परवानगी महानगरपालिकेकडून देण्यात येणार नाही. मंडप/स्टेज इ. (अंतर) विद्युत तार व डी.पी. बॉक्स पेक्षा ६ फुट अंतरावर ठेवणे संबंधित मंडळावर बंधनकारक आहे.

१४) सार्वजनिक उत्सवाकरीता आवश्यक विद्युत कनेक्शन महापालिकेच्या कोणत्याही रस्त्यावरील विद्युत पोलमधून घेता येणार नाही. असे आढळून आल्यास संबंधित मंडळावर दंडात्मक कारवाई करुन त्यांची परवानगी रद्द करण्यात येईल.

१५) संबंधीत मंडळाला महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या जागी उभारण्यात आलेल्या मंडपापासून जास्तीत जास्त १५ मीटर अंतरापर्यंतच विद्युत रोषणाई करता येईल.

- **शुल्क वसुली :-**

१६) नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील रस्ता/सार्वजनिक ठिकाणी उत्सव, सण, धार्मिक कार्यक्रम तसेच वैयक्तिक कारणांसाठी मंडप/स्टेज उभारणेसाठी यापूर्वी मा. महासभेने पारित केलेल्या ठरावाप्रमाणे आवश्यक शुल्काची वसूली संबंधित मंडळाकडून करण्यात येईल.

- **परवानगी कालावधी :-**

१७) सार्वजनिक रस्ते तात्पुरते व्यापण्यासाठी किंवा त्यावर उभारणी करण्यासाठी सर्वसामान्यपणे खाजगी उत्सव किंवा समारंभ यांच्याबाबतीत पाच दिवस किंवा सार्वजनिक उत्सव किंवा समांरभ यांच्या बाबतीत पंधरा दिवस हयापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी देण्यात येणार नाही.

१८) मंडळाने उभारणी केलेला मंडप/स्टेज उत्सव संपल्यानंतर स्वखर्चाने काढून रस्ता पूर्ववत करुन देणे बांनकारक राहील.

१९) मंडळाने सार्वजनिक ठिकाणी कचरा, घाण व अस्वच्छता करु नये असे बंधन राहील.

२०) सभा/कार्यक्रम संपल्यानंतर त्या जागी करण्यात आलेले उंचवटे, खड्डे बुजविणे, मैदानाची साफ-सफाई करुन देण्याची जबाबदारी मंडळाची राहील.

## ● ध्वनी प्रदुषण तक्रारींबाबत कार्यपद्धती :-

२१) सार्वजनिक ठिकाणी वातावरणात दिवसेंदिवस ध्वनीची तिव्रता औद्योगिक कामे, विविध प्रकारची बांधकामे, जनित्रे(जनरेटर्स), ध्वनीवर्धक (लाऊड स्पीकर्स), सार्वजनिक सभा, संगीत वाद्ये, वाहनांचे भोंगे व इतर यांत्रिक साधानामुळे ध्वनीचे प्रमाण वाढतच आहे. ध्वनी प्रदुषणामुळे नागरीकांच्या आरोग्यावर मानसिक स्वास्थावर अनिष्ट परिणाम होत असल्यामुळे तसेच वातावरणातील ध्वनीची योग्य पातळी राखण्याच्या हेतूने ध्वनी निर्माण करणा-या स्त्रोतांचे नियमन व नियंत्रण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दि.२१ एप्रिल २००९ अन्वये ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

२२) बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी ध्वनी प्रदुषण करणारी उपकरणे/स्त्रोत जसे D.G. Sets, Gnerator Sets, इमारतीसाठी वापरण्यात येणा-या संविधा, घरगुती उपकरणे इत्यादींची सभोवतालच्या हवेतील ध्वनी प्रदूषण गुणवत्ता खाली नमुद केल्याप्रमाणे असेल.

...७...

२३) आवाजाच्या संबंधीत सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा :-

| क्षेत्र संकेतांक | क्षेत्र/झोन प्रवर्ग | डेबि(ए)एल ईक्यू दिवसा | मधील मर्यादा रात्री |
|---|---|---|---|
| (अ) | औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| (ब) | वाणिज्यिक क्षेत्र | ६५ | ५५ |
| (क) | निवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| (ड) | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

**टीप :-**

१) दिवसा म्हणजे सकाळी ६.०० ते रात्री १०.०० पर्यंत
२) रात्री म्हणजे १०.०० ते सकाळी ६.०० पर्यंत
३) शांतता क्षेत्र म्हणजे रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये, धार्मिक ठिकाणे किंवा सक्षम प्राधिकरणाने अशी क्षेत्रे म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही क्षेत्रे यांच्या सभोवतालच्या १०० मीटरपर्यंतच्या क्षेत्राचा समावेश असलेली क्षेत्रे.
४) संमिश्र क्षेत्र हे वर नमुद केलेल्या चारांपैकी एक क्षेत्र असल्याचे सक्षम प्राधिकरणाकडून घोषित करण्यात येईल.

२४) ध्वनी प्रदूषणाच्या प्राप्त झालेल्या तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र रजिस्टरची व्यवस्था केलेली आहे. प्राप्त झालेली ध्वनी प्रदूषणाची तक्रार कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस स्टेशनला व पोलीस कंट्रोल रुमला अग्रेषीत करण्यात येणार आहे.

- **शांतता क्षेत्र जाहीर करणे :-**

२५) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई यांना शांतता क्षेत्र अधिसूचना क्रमांक नमुंमपा/श.अ./२५१६/२०११, दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ अन्वये एकूण ६४ ठिकाणी शांतता क्षेत्र (Silence Zone) जाहिर करण्यात आलेले आहे.

## ● तक्रार निवारण व्यवस्था :-

२६) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नवी मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवाच्यावेळी अनधिकृतरित्या उभारलेल्या मंडपांबाबत तसेच ध्वनी प्रदूषणाबाबत, नागरिकांच्या तक्रारी स्विकारण्यासाठी सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली आपत्कालिन विभागाची टोल फ्री नंबर, ई-मेल सुविधा, एस.एम.एस. सुविधा खालीलप्रमाणे उपलब्ध केलेली आहे. व त्यास उचित प्रसिध्दी देण्यात येत आहे.

टोल फ्री नंबर : २७५७०६१० / २७६५५३७०
ई-मेल : १) subhash_ingale@nmmconline.com,
२) patilsuresh@nmmconline.com
Complaint portal : www.nmmconline.com

२७) वरिलप्रमाणे आदेश परिमंडळ विभागाला दिलेले असून सर्व विभाग अधिकारी, सहाय्यक आयुक्त, सर्व विभाग प्रमुख, सर्व उप आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांना उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत केलेले आहेत.

२८) ध्वनी प्रदूषण तसेच इतर प्रदूषण होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी मंडळाची राहील.

२९) पोलीस, वाहतूक यंत्रणा, शासन यंत्रणा यांना दिलेले सर्व निर्देश यांचे काटेकोर पालन करणे मंडळास बंधनकारक राहील.

***********************